**प्रेसनोट** दि. २७.०४.२०२१

**शिर्षक** - तक्रारदार यांचे भावाविरुध्द पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयात पोलीस अधिका-याशी असलेल्या संबंधामुळे वाढीव पोलीस कोठडी न मागणेकरीता व तपासात मदत करणेसाठी खाजगी इसम यांनी तक्रारदार यांच्याकडे ४,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता म्हणून २,००,०००/- रुपये त्यात ७०,०००/- रुपये रोख रक्कम स्विकारुन त्यांच्या सहका-यांसह वाहनामधून पळुन गेले म्हणुन त्यांचे विरुध्द पंढरपूर शहर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा दाखल

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | पंढरपूर शहर पो.स्टे.सोलापुर ग्रामीण, गु.र.नं. /२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ (अ) सह भा.द.वि.स कलम २०१, ३४ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | खाजगी इसम विशाल काटे व इतर इसम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,००,०००/-रु. मागणी करुन त्यातील पहिला हप्ता म्हणून २,००,०००/- रुपये त्यात ७०,०००/- रुपये रोख रक्कम स्विकारले. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे भाऊ अमर पाटील यांचेविरुध्द पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे सदर गुन्हयात त्यांना अटक केली असुन त्यांना एक दिवस पोलीस कस्टडी रिमांड मिळालेली आहे. यातील खाजगी इसम विशाल काटे यांने पोलीस अधिकाऱ्याशी असलेल्या संबंधामुळे त्यास वाढीव पोलीस कस्टडी रिमांड न मागणेसाठी तक्रारदार यांचेकडे ४,००,०००/-रु. लाचेची मागणी करुन त्यातील पहिला हप्ता म्हणून २,००,०००/- रुपये त्यात ७०,०००/- रुपये रोख रक्कम स्विकारले. खाजगी इसम नामे विशाल काटे व वाहन क्रमांक एमएच १३.डीई.४२८० वरील चालक व इतर इसम यांचेविरुध्द लाच मागणी करुन सदरची रक्कम स्विकारुन स्विफ्ट गाडी क्रमांक एमएच १३.डीई.४२८० या मधून पळुन गेले. |
| सापळा पथक | सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुरज गुरव, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधिक्षक, पोलीस निरीक्षक कविता मुसळे, पोह/शिरीषकुमार सोनवणे, मपोना/अर्चना स्वामी, पोना/प्रमोद पकाले, पोना/ अतुल घाडगे, पोकॉ/प्रफुल्ल जानराव, चापोकॉ/ शाम सुरवसे; सर्व नेम अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग.म.रा.शी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर ४१३४०३. |
| संकेत स्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | dyspacbsolapur@gmail.com |
| ऑनलाईन तक्रार अॅप | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२१७-२३१२६६८ |

२७/०४

(संजीव पाटील)
सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

Asst. Comm. of Police/Deputy Supdt. of Police
Anti Corruption Bureau, Solapur

Scanned with CamScanner